# समिती दर्पण

जुलै २०२६

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www.samiti.org


### समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाकडे पहावे लागेल. गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्च शिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्य सेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरुवात झाली. आज समितीची पुण्यात सात आणि नगरमध्ये दोन अशी नऊ वसतिगृहे आहेत. त्यात १३५० हून अधिक विद्यार्थी -विद्यार्थिनींची निवास - भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर सात दशके समितीचे काम चालते.

# समितीच्या उपक्रमांना 'क्रेडिट'

## नव्या शैक्षणिक धोरणानुसार संसाधन संस्था म्हणून मान्यता

**पुणे :** विद्यार्थ्यांचा सर्वांगिण व्यक्तिमत्त्व विकास करून त्यांचे आयुष्य घडविण्याचे कार्य विद्यार्थी साहाय्यक समिती गेली सहा दशके करीत आहे. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अभिप्रेत असणारे काम समितीत अविरतपणे सुरू आहे. त्यामुळे समितीचे उपक्रम अधिकृत पद्धतीने श्रेयांक (क्रेडिट) पद्धतीत बसविण्यासाठी मी प्रयत्न करणार आहे. समिती आता संसाधन संस्था (रिसोर्स इन्स्टिट्युट) म्हणून काम करू शकते, असे गौरवोद्गार महाराष्ट्र शासनाच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण कार्यबल समितीचे अध्यक्ष आणि समितीचे सल्लागार प्रा. (डॉ.) नितीन करमळकर यांनी काढले.

समितीच्या डॉ. अ. शं. आपटे वसतिगृहात १८ जुलै रोजी झालेल्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या इनोव्हेशन आणि इन्क्युबेशन केंद्राचे संचालक डॉ. देविदास गोल्हार, विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, समितीचे विश्वस्त, कार्यकर्ते उपस्थित होते. सुरुवातीला कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांनी उपस्थितांचे स्वागत करून या बैठकीमागील भूमिका विषद केली. विश्वस्त डॉ. ज्योती गोगटे यांनी समितीचे उपक्रम नव्या शैक्षणिक धोरणानुसार श्रेयांक पद्धतीत कसे बसू शकतात, याविषयी सादरीकरण केले.

समितीमध्ये ग्रामीण भागातील गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना अल्पदरात निवास, भोजनाची व्यवस्था करतानाच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध उपक्रम राबविले जातात. रोज सकाळी योगासन वर्ग, रोज अर्धा तास श्रमदान, कमवा व शिका, विद्यार्थी




विकास केंद्रांतर्गत व्याख्याने, चर्चासत्रे, क्रीडा, जीवनकौशल्य विकास, उद्योजकता, डिजिटल साक्षरता, स्मार्ट शेती, विद्यार्थी व्यवस्थापन यातून विद्यार्थ्यांची जडणघडण होते. हे उपक्रम अनुभवाधारित शिक्षण म्हणून नवीन शैक्षणिक धोरणानुसार श्रेयांक पद्धतीत बसविता येतील, अशी कल्पना डॉ. करमळकर यांनी मांडली होती. डॉ. ज्योती गोगटे यांनी त्याचा विस्तृत आराखडा तयार केला. त्यावर या बैठकीत चर्चा होऊन त्याला मान्यता देण्यात आली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची संलग्नता घेऊन हे उपक्रम श्रेयांक पद्धतीने सुरू करण्यावर एकमत झाले. यात १५ तासांचे वर्गाधारित आणि ३० तासांचे अनुभवाधारित शिक्षण असणार आहे. या अभिनव उपक्रमाचे शिक्षणतज्ज्ञ, प्राचार्यांनी कौतुक केले. यावेळी विद्यार्थिनी माहेश्वरी गिरडे आणि पूजा कदम यांनी समितीतील उपक्रमांचा कसा लाभ होतो आणि हे उपक्रम श्रेयांक पद्धतीत आल्यावर कसा फायदा होईल, हे सांगितले. पर्णवी म्हस्के हिने सूत्रसंचालन केले. चंद्रकांत कुलकर्णी यांनी आभार मानले.






## विकसित भारत युवा संसदेत चैतन्य गर्जेचा सहभाग

भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'विकसित भारत युवा संसद २०२६' मध्ये समितीचा विद्यार्थी चैतन्य रावसाहेब गर्जे याने राज्याचे प्रतिनिधित्व केले.

दिल्लीत संसद भवनात झालेल्या या कार्यक्रमात सहभागी होण्याचा बहुमान महाराष्ट्रातील केवळ तीन विद्यार्थ्यांना मिळाला. त्यामध्ये हरिभाऊ पाठक वसतिगृहातील चैतन्यचा समावेश होता

या कार्यक्रमाला लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, युवा कार्यक्रम व खेळ मंत्री मनसुख मांडवीय, राज्यमंत्री रक्षा खडसे व अन्य लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

# सिएटलच्या अधिवेशनात समितीच्या गुढ्या

## अमेरिकेतील मराठीजनांपर्यंत पोचणार विद्यार्थिनींचे कौशल्य

**पुणे :** अमेरिकेत सिएटल येथे ऑगस्ट महिन्यात होणाऱ्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनासाठी समितीच्या विद्यार्थिनींनी तयार केलेल्या दोन हजार गुढ्या नुकत्याच पाठविण्यात आल्या. समितीच्या कमवा व शिका योजनेअंतर्गत तयार करण्यात आलेल्या या आकर्षक आणि सुबक गुढ्या या अधिवेशनासाठी नोंदणी केलेल्या मान्यवरांना मंडळामार्फत भेट देण्यात येणार आहेत.

आपल्या संस्कृतीचे प्रतिक असलेल्या या गुढ्या अमेरिकेतील सुमारे दोन हजार मराठी घरांमध्ये जाणार असून त्या निमित्ताने समितीचे काम आणि विद्यार्थिनींचे कौशल्यही तेथे पोचणार आहे. दर दोन वर्षांनी होणारे बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन म्हणजे तेथील मराठीजनांचा उत्सवी सोहळा असतो. आपली संस्कृती, परंपरा जपत, तो समृद्ध वारसा नव्या पिढीकडे देण्यासाठी मराठी मंडळी उपक्रम राबवीत असतात. हे करताना त्यांच्यातील सामाजिक जाणीव तेवढीच प्रगल्भ असते.

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष प्रसाद पानवलकर यांनी अधिवेशनासाठी उपस्थित मान्यवरांना गुढी भेट देण्याची संकल्पना उचलून धरली. ग्रामीण भागातील गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी समिती करीत असलेले काम त्यांना माहिती आहे. मंडळाच्या अधिवेशनाच्या माध्यमातून या विद्यार्थ्यांना कशी मदत करता येईल, या विचारातून त्यांनी गुढीची संकल्पना राबविण्याला प्रोत्साहन दिले.



### तीन आठवड्यांत दोन हजार गुढ्या

समितीतील विद्यार्थिनींनी कमवा- शिका योजनेंतर्गत दोन हजार गुढ्या तयार करून त्या अमेरिकेला पाठविल्या. गुढ्यांसाठी कापड आणण्यापासून गुढी तयार करून, त्याचे सुंदर पॅकिंग अमेरिकेला पाठविण्यापर्यंत केवळ तीन आठवड्यांत या मुलींनी मेहनत घेतली. यातून झालेल्या अर्थार्जनातून त्यांच्या शिक्षणाला मदत होणार आहे.



### सिएटलच्या अधिवेशनात समितीचा स्टॉल

अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळाचे यंदाचे अधिवेशन सिएटल शहरात ६ ते ९ ऑगस्ट दरम्यान होत आहे. तेथील मराठी मंडळींनी अधिवेशनादरम्यान विविध उपक्रम आयोजित केले आहेत. भारतातून अनेक कलाकार त्यासाठी उपस्थित राहणार आहेत. बृहन्महाराष्ट्र मंडळाने त्यांच्या 'समाजरंग' या उपक्रमांतर्गत भारतातून ज्या पाच संस्था निवडल्या आहेत त्यामध्ये विद्यार्थी साहाय्यक समितीचा समावेश आहे याअधिवेशनात अनेक सामाजिक संस्थांचाही सहभाग असणार आहे.

या अधिवेशनासाठी समितीचे विद्यार्थी पुण्यातून 'कमवा व शिका' अंतर्गत संपूर्ण डिजिटल सपोर्ट, वेबसाईट व्यवस्थापन, व्हिडिओ रील, आदी कामे करीत आहेत तसेच समितीच्या विद्यार्थिनींनी तयार केलेल्या गुढ्यांचा समावेश मंडळाने अधिवेशनाच्या 'वेलकम किट'मध्ये केला आहे. समितीचा स्टॉलही तेथे आहे. उपस्थित सर्व मान्यवरांनी या स्टॉलला भेट द्यावी, अशी विनंती समिती परिवाराने केली आहे.

# सीट नसलेली सायकल ते मर्सिडिज व्हाया समिती

## तयाचा वेलू...

एका निवांत वेळी घराच्या बाल्कनीतून समोर पाहताना काही मुले सायकल खेळताना दिसली. त्यांची ती कसरत आणि सायकल पळविण्याची जिद्द पाहून कौतुक वाटले. नकळत माझे ते दिवस आठवले. पुण्यात कॉलेजला जाताना जुनी आणि सीट नसलेली सायकल घेऊन जावे लागत होते. आता मर्सिडिजमधून फिरतो, देशविदेशात जातो. पण त्या दिवसांतील आठवणी अजूनही मनःपटलावर रेंगाळतात.

सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील शिवपुरीमध्ये माझे बालपण गेले. वडील कांदेबटाटे विकण्याचा व्यवसाय करायचे, तर आई शेती महामंडळात रोजंदारी कामगार म्हणून काम करीत असे. पाच बहिणी आणि चार भाऊ असे आमचे कुटुंब. त्यात माझा आठवा नंबर. रोजचा दिवस कसाबसा भागायचा, अशी आर्थिक परिस्थिती. घरात फार कोणी शिकलेले नव्हते. गाई- म्हशी राखत मी दहावीपर्यंतचे शिक्षण शिवपुरीला पूर्ण केले.

दहावीत ७५ टक्के गुण मिळाले. कौतुकाचा विषय ठरलो. सगळ्यांच्या माझ्याकडून अपेक्षा वाढल्या. अकरावी- बारावी नातेपुते येथे विज्ञान शाखेतून केली. बारावीला चांगले मार्क्स मिळाले. पण पुढे काय, असा प्रश्न होता. एका मित्राने विद्यार्थी साहाय्यक समितीबद्दल माहिती दिली आणि एक आशेचा किरण दिसला. पुण्यात सरफेस कोटिंग अभ्यासक्रमाला प्रवेश मिळाला. समितीत निवासासाठी प्रवेश झाला.



समितीतील त्या तीन वर्षांनी मला आयुष्यभराची शिदोरी दिली. वेगवेगळ्या भागातील, वेगवेगळ्या परिस्थितीतील अनेक मित्र मिळाले. समितीतल्या योगा, चार तास काम, कमवा- शिका, विद्यार्थी व्यवस्थापन या विविध उपक्रमांचा माझ्या व्यक्तिमत्व विकासासाठी खूप उपयोग झाला.

डिप्लोमा पूर्ण झाल्यानंतर १९९२ मध्ये एशियन पेंट्समध्ये नोकरी मिळाली. मला त्यात रस नव्हता. वेगळे काहीतरी करायचे म्हणून मन अस्वस्थ होते. मग पुण्याला येऊन अर्धवेळ बी.ई.साठी प्रवेश घेतला. टेक्सल एंटरप्राईजेसमध्ये अनुभवासाठी काम करायला लागलो. पण व्यवसाय करायची इच्छा मनात असल्याने त्या कामाचा राजीनामा देऊन पेंटिंग कंपन्यांसाठी कन्सल्टन्सी स्वरुपाचे काम सुरू केले.

त्यावेळी मी कॉट बेसिसवर राहात होतो. कर्वेनगरमध्ये एक छोटे ऑफिस भाडेतत्त्वावर घेतले. त्यासाठी जुन्याच टेबल- खुर्च्या खरेदी केल्या. दोन इंजिनीअर कामासाठी नेमले. हळूहळू ऑर्डर मिळायला लागल्या. पेंटिंग बूथ, ओव्हन, पावडर कोटिंग सिस्टीम अशा प्रकारच्या गोष्टी कंपन्यांकडून मटेरिअल घेऊन त्यांना बनवून द्यायला सुरुवात केली. हा उद्योग १९९८ पर्यंत चालला. १९९९ मध्ये कन्सल्टेक इंजिनीअर्स प्रा. लि. नावाने कंपनी सुरू केली. २००१ मध्ये दुबईमध्ये पावडर कोटिंग इक्विपमेंट द्यायला सुरुवात केली. मग कतार, कुवेत, बहारीन तसेच भारतात किर्लोस्कर, सुल्झर, सँडविच एशिया, कमिन्स, क्रॉम्प्टन ग्रीव्हज अशा कंपन्यांमधून उत्पादनांना मागणी वाढली. छोट्या कार्यालयातून सुरू केलेले काम काही हजार चौरस फुटांत विस्तारले. कोणतेही कर्ज न घेता, मिळालेल्या नफ्यातूनच टप्प्याटप्प्याने विस्तार करीत गेलो.

कामाचा व्याप वाढत असताना जर्मनीतील एका कंपनीबरोबर बोलणी करून त्यांच्यासोबत पेंटमधील नॅनो टेक्नॉलॉजीमध्ये कामाला सुरुवात केली. आमच्या टेक एक्सपर्ट इंडिया कंपनीचे नाव या क्षेत्रात बऱ्यापैकी वर आहे. मात्र जर्मन लोकांचा विश्वास संपादन करणे, ही तशी जिकिरीची गोष्ट. पण समितीतील कष्ट आणि कमिटमेंट या संस्कारांमुळे हे शक्य झाले. आता कंपनी विस्तारते आहे. हा सर्व प्रवास पाहताना समितीतील त्या दिवसांनी फक्त राहण्याची आणि जेवणाची सोय केली नाही, तर जगण्याला आकार दिला, याची नम्र जाणीव मनात आहे.

देणगीदारांच्या सहाय्यामुळे आपल्या शिक्षणाला हातभार लागला. आपण एका टप्प्यापर्यंत पोहोचू शकलो, या जाणिवेतून आता देणगीदारांच्या यादीत स्वतःचे नाव समाविष्ट करताना विशेष आनंद वाटला. मुलींसाठी पुण्यात नुकत्याच बांधलेल्या नवीन वसतिगृहातील एका खोलीसाठी आईच्या नावाने देणगी देता आली. हा एक उतराई होण्याचा छोटा प्रयत्न आहे. प्रत्यक्ष वेळ कमी देता येत असला तरी आर्थिक स्वरुपात, येथील विद्यार्थ्यांशी संवाद स्वरुपात काम सुरू आहे. शिक्षणाने पिढी बदलते, याचे आम्ही माजी विद्यार्थी उदाहरण आहोत.

**- जे. व्ही. ऊर्फ राजू इंगळे**

## विद्या सूर्यवंशी, नेहा पारखी निवृत्त

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या पर्यवेक्षिका विद्या सूर्यवंशी आणि कर्मचारी नेहा पारखी नुकत्याच समितीच्या सेवेतून निवृत्त झाल्या. श्रीमती सूर्यवंशी यांनी सुमित्रा सदन, डॉ. अ. शं. आपटे वसतिगृह आणि अहिल्यानगर येथील मधुभाऊ चौधरी वसतिगृह येथे २४ वर्षे सेवा दिली. श्रीमती पारखी यांनी विविध उपसमितीअंतर्गत १९ वर्षे सेवा दिली.







## समितीतील कृषी प्रकल्पात ११ भाज्यांची लागवड

समितीच्या लजपत भवन परिसरातील कृषी प्रकल्पात ३० जून ते २ जुलै दरम्यान विद्यार्थ्यांनी भाजीपाला लागवड केली. बारामतीतील ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या सहकार्याने आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित हा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे.

या प्रकल्पांतर्गत वीस ते पंचवीस विद्यार्थ्यांनी ११ प्रकारच्या भाज्या लावल्या. यामध्ये वांगी, मिरची, भेंडी, कारले, दुधी भोपळा, दोडका यांचा समावेश आहे. येथे इनलाइन ड्रिप इरिगेशन आणि मल्चिंग पेपरचा वापर केला आहे. त्यामुळे पाण्याची बचत होऊन तणांची वाढ कमी होईल. या ठिकाणी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित शेतीचे प्रात्यक्षिक देण्यात येणार आहे. मातीतील आर्द्रता, हवामानाचा अंदाज, पाणी व्यवस्थापन, खतांचे नियोजन, पिकांची वाढ आणि रोग-किडींचे वेळेवर निदान यासाठी हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरते. यामुळे कमी खर्चात अधिक उत्पादन घेण्यास आणि शाश्वत शेती विकसित करण्यास मदत होते. भविष्यातील तंत्रज्ञानाधारित शेतीची ओळख विद्यार्थ्यांना या उपक्रमातून होत आहे.

## विमान वाहतूक क्षेत्रातील संधींबाबत मुलींना मार्गदर्शन

विद्यार्थी साहाय्यक समिती व विद्यार्थी विकास केंद्राच्या वतीने मुलींसाठी आयोजित करण्यात आलेल्या Fully Funded Commercial Pilot Program संदर्भातील जनजागृती सत्राचे आयोजन २७ जुलै रोजी गायतोंडे वसतिगृहातील योगा हॉलमध्ये करण्यात आले होते. या सत्राला द्वितीय व तृतीय वर्षातील १७१ विद्यार्थिनी उपस्थित होत्या. यावेळी अनुजा जैन आणि संकेत काळे यांनी विद्यार्थिनींना IndiGoReach Giving Wings to Fly या उपक्रमाबाबत मार्गदर्शन केले. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील मुलींसाठी उपलब्ध असलेल्या Commercial Pilot Licence (CPL) प्रशिक्षणाची संपूर्ण फी, मोफत निवास व भोजन, तसेच प्रशिक्षणादरम्यान मिळणारे मार्गदर्शन आणि करिअरच्या संधी याविषयी माहिती दिली.

यावेळी पायलट होण्यासाठी आवश्यक पात्रता, अर्ज प्रक्रिया, निवड पद्धती, प्रशिक्षणाचा कालावधी आणि विमानवाहतूक क्षेत्रातील रोजगाराच्या संधी याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थिनींच्या विविध शंकांचे निरसन करून त्यांना या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले.





## वाटेवर फुलले ज्ञानियाचे मळे...

कॅनडातल्या दिनक्रमात एक महत्त्वाचा भाग म्हणजे माझं संध्याकाळचं फिरणं. हवेतला आल्हाददायक गारवा अनुभवत असताना इथल्या घराघरांसमोर उमललेल्या रंगीबेरंगी, खरं तर बहुरंगी, फुलांचे ताटवे पाहाताना वेळ कधी संपतो आणि आपण घरी पोहोचतो ते कळतदेखील नाही. मात्र इथली एक मजा मनाला कायम भुरळ पाडणारी आहे आणि तिच्याविषयीच मी आज लिहिणार आहे. तिचं नाव आहे मुक्त वाचनालय.

चिमुकलं घर, एक छोटंसं लाकडी खोकं, वरच्या बाजूला निमूळतं होत जाणारं छप्पर, समोरच्या बाजूला एक पारदर्शक दार, ते बंद करण्यासाठी लावलेली खिटी. प्रथमदर्शनी, पक्ष्यांसाठी दारात उभं केलेलं घरच वाटतं आणि आत काय म्हणाल तर पंचवीस- तीस पुस्तकं...! तीही वेगवेगळ्या विषयावरील- कादंबऱ्या, चरित्रं, लहान मुलांसाठीची पुस्तकं. वरच्या बाजूला एका पट्टीवजा पत्र्यावर पुढील शब्द दिसले- एक पुस्तक घ्या आणि एखादं पुस्तक ठेवा.



“हा काय प्रकार आहे गं...”, मुलीला विचारलं. तेव्हा तिच्या उत्तरांनी माझ्या मनातलं कोडं उलगडलं आणि मनाला एक आगळंच समाधान आणि आनंद लाभला. इथल्या नागरिकांच्या डोक्यातील या उदात्त उपक्रमाबद्दल मनाला आनंदही वाटला. त्याची ही कथा. यावर गडद तपकिरी रंगात 'शोरा' अशी अक्षरं लिहिलेली असतात. शोरा म्हणजे Sheridan Homelands Ratepayers’ Association- SHORA. वाचनप्रेमी रसिक नागरिकांच्या सुपीक डोक्यातून ही कल्पना निघाली असावी. इथल्या अतिशीत प्रदेशात राहाणाऱ्या लोकांना वाचन हाच मोठा विरंगुळा असावा. 'शोरा'चं सर्वात महत्वाचं वैशिष्ट्य म्हणजे हे ग्रंथालय पूर्णपणे निःशुल्क आहे आणि ते



कायम उघडं असतं. कुणी किती पुस्तकं घ्यावीत, यावरही काही बंधन नसतं. एक समंजस अपेक्षा असते. ती म्हणजे तुम्ही एखादं पुस्तक वाचण्यासाठी घेतलंत तर आपल्याजवळील एखादं पुस्तक तुमच्यासारख्याच दुसऱ्या वाचनप्रेमीसाठी ठेवावं. अर्थात, कोणत्याही प्रकारचं बंधन नाही. इतर सर्वसाधारण ग्रंथसंग्रहालयात असते, तशी येथे पुस्तक परत करण्यासाठी कालमर्यादाही नसते किंवा दंडही नसतो किंवा इथून घेतल्या जाणाऱ्या पुस्तकांची कोणत्याही प्रकारची नोंद नसते.

मी राहाते त्या परिसरातच अशा प्रकारची पाच शोरा ग्रंथालयं आहेत. बहुतेक सगळ्या ठिकाणी मला वेगवेगळ्या विषयांवरील पुस्तकं मिळाली आहेत आणि मी त्यांचा आस्वादही घेत आले आहे. सर्वात मोठं वैशिष्ट्य मला जाणवलं ते विषयांचं वैविध्य. इथे मला एकदा तिबेटचे धर्मगुरू दलाई लामांच्या दैनंदिन जीवनात उपयुक्त ठरतील अशा ३६५ सुविचारांचं पुस्तक मिळालं, तर एकदा अमेरिकेतील प्रख्यात, पण अपयशी ठरलेली राजकारणी महिला हिलरी क्लिंटननं लिहिलेली प्रांजळ आत्मकथाही दिसली. अगदी वेगळा आणि लोभस असा गुण मला इथल्या वाचकांविषयी वाटला तो असा, अगदी अपवादात्मक म्हणावी अशी काही पुस्तकं खूप हाताळलेली असल्यामुळं जुनी झालेली दिसली पण बहुतेक सर्व पुस्तकं ना कुणाचं पान खुणेसाठी दुमडलंय, ना कुठे शेरेबाजी केलीय, अशी खास जपणूक केलेली होती.

या ज्ञानियाच्या मळ्यांची भलावण करताना मनात एक तुलना, एक विचार येतो आहे. आपल्याकडे पूर्वीच्या काळी लोक यात्रेला जाताना पायीच जात असत. तंगडतोड करत मार्गक्रमण करत. काशीला जायचं आणि तीर्थयात्रेचं फळ पदरी पडल्याचं समाधान मिळवायचं, एवढी एकच माफक अपेक्षा असायची. उन्हातान्हातून वाटचाल करणाऱ्या प्रवाशांना पाणी तरी मिळावं याकरिता पाणपोया बांधणाऱ्यांमध्ये मोठं नाव त्या काळी कमावलं ते पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी. मला इथली शोरा ग्रंथसंग्रहालय पाहिल्यावर त्या पाणपोया आठवल्या. वाचनप्रेमी तृषार्तांसाठी उभ्या केलेल्या ज्ञानपोया! इथे या आणि आपली ज्ञानतृष्णा भागवा, असा मूक संदेश देणाऱ्या !

**- नीला चांदोरकर,** कॅनडा
(समितीच्या देणगीदार)